शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसैनिकांनी घातले गजानन महाराज यांना साकडे ! >> पान 2

'विदर्भ ग्लोबल स्किल युनिव्हर्सिटी'साठी १०० एकर जागा देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 3

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अतिरिक्त निधी द्या >> पान 4

**सुविचार**

सातत्य हेच स्वप्नांना वास्तवात आणते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




ज्योतिर्लिंग दर्शनानंतर प्राजक्ता माळी पोहोचली प्रयागराजला, महाकुंभात केलं पवित्र स्नान

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 180 ■ सोमवार, दि. 10 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# आम्ही अडीच वर्षात रेकॉर्ड ब्रेक योजना राबविल्या

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी : हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या सांगण्यानुसार २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण करत आलो आहोत.अवघ्या अडीच वर्षाच्या काळात आम्ही रेकॉर्ड ब्रेक योजना राबविल्या आहेत.याचा जनतेला फायदा झाला आहे. यात मला खूप मोठे समाधान मिळत आहे.असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. ते वाढदिवसाचे औचित्य साधून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत लोकोपयोगी आरोग्य सेवा उपक्रमांचे लोकार्पण व राज्यातील दोन कोटी महिलांची आरोग्य तपासणीचा शुभारंभ व रुग्णवाहिका लोकार्पण सोहळ्यानिमित्त ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.**

या कार्यक्रमास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, केंद्रीय आयुष मंत्री भारत सरकार प्रतापराव जाधव,अभिनेता गोविंदा, नविन सोना, आरोग्य सेवा तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक अमगोथू श्री रंगा नायक तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. स्थानिक लोकप्रतिनिधीही या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली या लोकार्पण सोहळा आणि महिला तपासणी शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन ठाणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले होते.

केंद्र सरकारच्या 'हर घर आयुर्वेद' या प्रकल्पाचा शुभारंभ आज माझ्या हस्ते यावेळी करण्यात आला. त्याचप्रमाणे मानसिक आरोग्यासाठी मायका या मोबाईल पचे उद्घाटनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते यावेळी झाले. आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या डॉक्टर्स, दंतशल्यचिकित्सक, अधिपरिचारिका तसेच आरोग्य सेविकांचा यावेळी सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, निरोगी महाराष्ट्रा'साठी माता–भगिनींचे आरोग्य जपणे महत्त्वाचे आहे. राज्य शासन निरोगी महाराष्ट्र बनविण्यासाठी कटिबद्ध असून, रुग्णांना वेळेवर तातडीने उपचार मिळणे आवश्यक आहे. सामाजिक, कौटुंबिक आणि व्यावसायिक जबाबदारी सांभाळत असताना माता–भगिनी कायमच आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे 'निरोगी महाराष्ट्र' बनविण्यासाठी सर्वप्रथम राज्यातील माता–भगिनींचे आरोग्य जपणे अतिशय महत्त्वाचे आहे,



आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर मला म्हणाले की, आजच्या दिवशी हा कार्यक्रम घ्यायला नको होता.पण मी म्हणतो आजचा दिवशी असेच कार्यक्रम घ्यायला हवेत व. बाळासाहेबांनी सांगितले ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे मी पळत आलो आहेत. एक वेळ एसटी महामंडळाच्या रेस्ट रूममधे गेलो.तथे सर्व भकास होते.त्या ठिकाणी एअर कंडीशन विश्रांती गृहाचे उद्घाटन केले. मगाशी म्हणालो एकजूट होऊया आणि कॅन्सर ल हरवू या, ७० कोटींचे नॅचरोपॅथी वेलनेस सेंटर सुरू करणार आहेत. मी सफरचंदाची पण लागवड केली आहे. मी गावी गेलो की मीडियामध्ये बातमी येते एकनाथ शिंदे नाराज. मी १० तास प्रवास करून जाण्यापेक्षा हेलिकॉप्टर ने जातो तेवढ्या वेळात १० हजार सह्या करतो म्हणून २ पेन ठेवले आहेत.

मुख्यमंत्री सहाय्यता कक्षातून ४५० कोटींची वाटप केले.अडीच वर्षात रेकॉर्ड ब्रेक योजना राबविल्या.महात्मा फुले आरोग्य योजना १.५ लाखाची होती आता ५ लाखाची केली. कोणी जात नाही तिथे मी जातो. मी मंत्री आहे बोलायला नको पण फाईल तयार करत बसलो तर माझी मंत्री पद जाईल म्हणून गाड्या भरून घेऊन गेलो वाटायला. आम्ही वाढदिवसानिमित्त लहान मुलांच्या हृदयाला छिद्र असतात त्यांना मोफत उपचार दिले. रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा मानून काम केले. काम करताना ह्या हाताने केलेलं ह्या हाताला कळत कामा नये अशी पद्धत माझी आहे. असे मत व्यक्त करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढदिवसानिमित्त दिलेल्या शुभेच्छा बद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

# आंबे शिवारात २ कोटी २० लाखांचा गांजा जप्त



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** तालुक्यात आंबे शिवारात तालुका पोलिसांनी केलेल्या कारवाईत मका,दादर पिकात लागवड केलेला दोन कोटी वीस लाख रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे. वन जमिनीत गांजा शेती केली जात असल्याची माहिती मिळाल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

आंबे शिवारात रूपसिंगपाडा येथे वन जमिनीत कैलास भाव सिंग पावरा हा गांजाची शेती करीत असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना मिळाली.त्यांनी याठिकाणी कारवाई करण्याचे आदेश दिले.त्यानुसार ८ फेब्रुवारी रोजी निरीक्षक जयपाल हिरे व त्यांचे पथक यांनी घटनास्थळी जात मका व दादर या पिकात लागवड केलेली गांजाची शेती उद्ध्वस्त केली.या कारवाईत पोलिसांनी अकरा हजार किलो गांजा जप्त केला. त्याची किंमत दोन कोटी वीस लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलिस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक जयपाल हिरे,सहाय्यक निरीक्षक श्रीकृष्ण पारधी, उपनिरीक्षक सुनील वसावे, प्रकाश पाटील, मनोज कचरे, मिलिंद पवार,असई कैलास जाधव,हवालदार पवन गवळी, अनिल चौधरी, आरिफ पठाण, मनोज नेरकर,चेतन बोरसे,पो. कॉ.कमलेश सूर्यवंशी, हर्षल चौधरी,राहुल गिरी, चालक सतीश पवार,सागर कासार यांनी केली. याबाबत हवालदार पवन गवळी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अधिक तपास उपनिरीक्षक मनोज कचरे करीत आहेत.

# शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का

## प्रकाश देसाई यांचा भाजपात जाहीर प्रवेश, भाजपच्या नेत्यांनी देसाईंचे केले जल्लोषात स्वागत

दैनिक आपला विदर्भ



**रायगड/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीचे प्राबल्य हे दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थेची भाजप मोर्चेबांधणी करताना दिसत आहे. अशातच शिवसेना शिंदे गटाचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख आणि शिवसेनेचा बडा नेता प्रकाश देसाई यांनी आज पालीत हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत भाजपात पक्ष प्रवेश केला.

यावेळी परळी सरपंच साक्षी देसाई, उपसरपंच अलका देशमुख व सर्व सदस्य, घोटवडे सरपंच व सदस्य , नेनवली, राबगाव सह अन्य ग्रामपंचायतीमधील शेकडो कार्यकर्ते व ग्रामस्थांनी जाहीर भाजप पक्ष प्रवेश केला. माजी सभापती उज्वला देसाई,माजी सभापती पिठू डुमना, माजी सभापती, पुष्पा डुमना, माजी पंचायत समिती सभापती श्री संजय परदेशी, सतीश देसाई, बापूराव देसाई, व त्यांचे समर्थक तसेच विजय नगर मधील धर्मेंद्र आंदेकर तसेच साईनाथ मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते यांनी ही भाजपात प्रवेश केला.

यावेळी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील,आमदार रवींद्र पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, विधानपरिषद आमदार विक्रांत पाटील,राजेश मपारा , गीता ताई पालरेचा यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकाश देसाई यांचे पक्षात जंगी स्वागत करण्यात आले. याचवेळी खासदार व आमदार यांचा जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी पालीतील लिमये सभागृह अफाट गर्दीने फुलून निघाले होते. यावेळी प्रकाश देसाई यांच्यासारखा बलाढ्य व सक्षम नेता भाजपाच्या प्रवाहात आल्याने पक्षाला संघटनात्मक उभारी मिळणार असल्याचे प्रतिपादन खासदार धैर्यशील पाटील यांनी केले.

# तपासामध्ये आकापर्यंत एसआयटी पोहोचली : आमदार सुरेश धस

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मस्साजोग येथील येथील सरपंच संतोष देशमुख हत्येला दोन महिने झाले आहेत. या प्रकरणात एसआयटी आकापर्यंत पोहोचली आहे. अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी नाशिक दौरवर असताना माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी आमदार सुरेश धस यांनी अधिक माहिती देताना सांगितले की दमानिया या काय म्हणाल्या करुणा मुंडे काय म्हणायला यापेक्षा त्यांच्याच पक्षातील लोक म्हणताय त्यांनी राजीनामा द्यावा. ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके यांनी देखील ती मागणी केली आहे. मी स्वतः त्यांचा राजीनामा मागितलेला नाही. तपासामध्ये आकापर्यंत एसआयटी पोहोचली आहे. आकाच्या पुढे गेल्यानंतर बघू, असं काही होईल मला वाटत नाही. त्यांचा राजीनामा घ्यावा की नाही घ्यावा हा सगळा निर्णय अजित पवार, प्रफुल पटेल आणि त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष यांच्या हातात आहे. त्यांनी मनात



आणले तर, त्यांचा राजीनामा तातडीने घेतला जाईल.यामध्ये त्यांच्या पक्षाची प्रचंड बदनामी होत आहे. त्यांचा पक्ष व्राँग बोक्स मध्ये चालला आहे. आमचा पक्ष पॉझिटिव बॉक्समध्ये चालला आहे.

हा हुं छा चू करणारे परळी मधील लोक आता संध्याकाळी शुकशुकाट झालाय.परळीतील व्यापाऱ्यांना विचारा सुटकेचा निश्र्वास त्यांनी सोडलाय. पाचशे व्यापाऱ्यांनी परळी शहर सोडले परभणी प्रकरणात मी आंदोलक आशिष वाकोडे यांची भेट घेतली. पालकमंत्री यांना आणि विनंती केली त्यांचा लाँग मार्च परत घेण्याची विनंती केली होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणात जनतेची माझ्याकडून जी अपेक्षा आहे, ते फाशीला गेल्यापर्यंत शांत बसणार नाही.तर, अंजली दमानिया पुरावे आहेत त्यामुळेच अंजली दमानिया बोलत आहेत. धनंजय मुंडे यात अडकले असतील तर, धनंजय मुंडे दोषी होतील. अडकले नसतील तर बळजबरी कोण अडवणार आहे. विष्णू चाटे हा नाशिकमध्ये आला होता.दहा तारखे नंतर त्याने त्याचा मोबाईल फेकून दिला आणि नंतर सरेंडर झाला. मोबाईल फेकला म्हणजे तपासात अडथळा येईल असे काही नाही. कंपनीला सांगून त्याचा डाटा रिकव्हर केलेला आहे. कृष्णा आंधळे यांच्या कुटुंबीय आणि पोलिसांकडून माहिती घेतली आहे. कृष्णा आंधळे हा संभाजीनगर येथे पोलीस बनण्याची तयारी करत होता. पोलिसाची तयारी करता करता तो गुन्हेगार बनला.गुन्हेगार बनल्यानंतर सायको झाला.बऱ्याच गुन्ह्यांमध्ये तो फरार आहे. मला वाटतं तो राज्याच्या बाहेर असावा, बकरी की मा कब तक दुवा मागेगी कोकरू बाळ आहे पकडले जाईल. तर करुणा मुंडे चे वक्तव्य तुम्ही ओळखून घ्यायचं.मनोज जरांगेयांना रस्त्यावर लढण्याची आवश्यकता नाही. रस्त्यावरची लढाई लढाईचे म्हटल्यावर आम्ही त्यांच्या सोबत असणार आम्ही जरी भाजपाचे असलो तरी रस्त्यावरच्या लढाईत आम्ही त्यांच्यासोबत राहू. परंतु त्याची आवश्यकता पडणार नाही मुख्यमंत्री त्यावर निर्णय घेतील. असे मत आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केले.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नितीन कायंदे

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** सिंदखेडराजा तालुक्यातील रुम्हणा येथील नितीन रावसाहेब कायंदे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या (अजित पवार गट) प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या 'अजितपर्व' युवा जोडो अभियानांतर्गत बुलढाणा येथे पार पडलेल्या 'भव्य युवक मेळावा' या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी ही नियुक्ती जाहीर केली आहे.

यावेळी आमदार मनोज कायंदे, जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. शेतकरी चळवळीतील युवा कार्यकर्ता असलेल्या नितीन कायंदे यांनी गेल्या काही वर्षांपासून शेतकऱ्यांना न्याय मिळावा म्हणून युवा वर्गाला सोबत घेऊन विविध प्रकारची आंदोलने उभारली आहेत. त्यामध्ये वन्यप्राण्यांचा उपद्रव या समस्येला, शासनाकडून मोबदला व त्रासदायक वन्यप्राण्यांच्या शिकारीची परवानगी असे भरीव, सकारात्मक व ठळकपणे नमूद करावे असे यश प्राप्त झाले आहे.



त्यांचे संघटनात्मक कार्य बघता राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी त्यांची सरचिटणीसपदी नियुक्ती केली आहे.

नियुक्ती पत्रात प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आल्याचे तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या विचारानुसार राष्ट्रवादी युवक काँग्रेस संघटना मजबूतीने उभी कराल, अशी अपेक्षा व्यक्त करीत अभिनंदन व शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत.

बुलढाणा येथे पार पडलेल्या युवक मेळाव्याला राष्ट्रवादीचे काँग्रेस पार्टीच्या विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नितीन कायंदे यांच्या नियुक्तीमुळे युवकांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७५ वर्ष पूर्ण होऊन ७६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले. १९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत म्हणजे पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे. विद्यपीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते. जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.

# शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसैनिकांनी घातले गजानन महाराज यांना साकडे !







## वाढदिवसानिमित्त नेत्र तपासणी शिबिरात झाली हजारो रुग्णांची मोफत तपासणी, चष्म्याचे वाटप

दैनिक आपला विदर्भ

**शेगाव/प्रतिनिधी :** शिवसेनेचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आज रविवारी संतनगरी शेगावात शिवसेनेकडून भव्य नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सर्वप्रथम श्री संत गजानन महाराज यांची महाआरती करून एकनाराव शिंदे यांच्या दिर्घ आयुष्यासाठी साकडे घातले नेत्र तपासणी शिबिराचं उद्घाटन रुग्ण शंकर उमाळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी तज्ञ डॉक्टरांकडून सहभागी झालेल्या रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली चष्म्यांचाही वाटप यावेळेस करण्यात आलं तर मोतीबिंदू काचेबिंदू आजारांतील रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी तारीख यावेळी देण्यत आली केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून ही शिबीर शेगाव येथील सईबाई मोटे उपजिल्हा रुग्णालयात घेण्यात आले या भव्य शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांनी शेकडो रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आले.

# राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य दुर्गम भागात पोहोचवणार - न्यायमूर्ती भूषण गवई













दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी : येत्या काळात राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य देशभरातील दुर्गम भागात पोहोचवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यासाठी राज्य शासनाचे सहकार्य घेण्यात येत असून त्यांच्या मदतीने शासकीय सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासोबतच त्यांना लाभ देण्यात येत आहे, अशी माहिती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिली.**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा. मुंबई यांच्या वतीने आयोजित धारणी येथे विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळावा आज पडला. यावेळी सर्वो च्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्यायमूर्ती अभय ओक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर, न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे, उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूरचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, पालक न्यायमूर्ती वृषाली जोशी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, इंद्रजीत महादेव कोळी, ड राजीव गोंडाणे, नवनियुक्त न्यायमूर्ती प्रवीण पाटील आदी उपस्थित होते.

श्री. गवई म्हणाले, मेळघाट परिसर हा निसर्ग संपन्न आहे. या भागात आदिवासी समाज बहुसंख्येने आहे. त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी शिबिर घेण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे. समाजात राजकीय समता प्रस्थापित करण्यासाठी राज्यघटनेने संरक्षण दिले आहे. देशात ७५ वर्षे संविधानाने पूर्ण केले आहे. त्यामुळे देशात लोकशाही प्रस्थापित झाली आहे. मात्र समाजात सामाजिक आणि आर्थिक समानता प्रस्थापित होणे गरजेचे आहे. राज्यघटनेत समानतेचे संरक्षणासाठी मूलभूत तत्वे आणि अधिकार दिले आहेत. त्यानुसार न्यायालय निर्णय देत आहे. देशात समानतेचे वातावरण निर्माण होण्यासाठी चांगल्या वैद्यकीय सुविधा, शिक्षण, रोजगाराच्या संधी, दिव्यांगांना मदत देऊन दरी मिटवण्याचे कार्य करावे.

श्री. ओक यांनी राज्यघटनेने कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाचा विकास करताना निवास, आरोग्य आणि त्याच्या उत्पन्नाची साधनाची सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. त्यामुळे शासनाने मूलभूत सुविधा पोहोचवून कुपोषणासारखा प्रकार प्रभावीपणे हाताळावा. शासकीय योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्यात यावे, असे आवाहन केले.

श्री. आराधे यांनी, लोकअदालतीच्या माध्यमातून सामंजस्याने न्याय मिळवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. श्री. चांदूरकर यांनी धारणी येथे न्याय मेळावा आयोजित केला आहे. या ठिकाणी कायदेविषयकही सल्ला मिळणार आहेत. याचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले. श्रीमती ढेरे यांनी भारतात लोकशाहीचा पाया रुजला आहे. प्रत्येकाला न्याय मिळणे, ही सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. श्री. सांबरे यांनी कोणीही न्यायापासून वंचित राहू नये, यासाठी कार्य करावे, असे आवाहन केले. श्रीमती जोशी यांनी शिबिराच्या माध्यमातून न्याय नागरिकांच्या दारी पोहोचलो आहे. त्यामुळे याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दुर्गम भागात मेळावा आयोजित करण्यात आला आहे. प्रत्येकाला मदत मिळावी यासाठी प्रशासन कार्यरत आहे, असे सांगितले. श्री. यार्लगड्डा यांनी सामान्य नागरिकांच्या मदतीसाठी मेळावा आयोजित करण्यात आला असल्याचे सांगितले.

यावेळी ज्योती पटोरकर, नारायण कासदेकर, मोहम्मद अरिफ अब्दुल हबीब, सतीश नागले, तरहाना शेख परवीन, आदर्श पटोलकर, अर्जुन पटोरकर, कमला जावरकर, रतई तारशिंगे, श्याम जावरकर, रामदास भिलावेकर, माही राठोड, पार्वती नागोरे यांना लाभाचे वाटप करण्यात आले.

वनस्पतींना पाणी देऊन शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. सुरवातीला बरडा येथील समूहाने गजली सूसून आदिवासी नृत्याने स्वागत केले. जिल्हा परिषद महाविद्यालयाने स्वागत गीत सादर केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ‘विदर्भ ग्लोबल स्किल युनिव्हर्सिटी’साठी १०० एकर जागा देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## खासदार औद्योगिक महोत्सवाचा समारोप

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** विदर्भात विविध उद्योग समूह आकारास येत आहेत या उद्योग समूहांना आवश्यक असलेले तंत्र कुशल मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात लागणार आहे. भविष्यातील रोजगाराची ही संधी लक्षात घेता स्थानिक युवकांना विविध कौशल्य देणाऱ्या विद्यापीठाची आवश्यकता होती यासाठी साकारणाऱ्या विदर्भ ग्लोबल स्किल युनिव्हर्सिटीसाठी शंभर एकर जागा उपलब्ध करून देण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिसरात सुरू असलेल्या तीन दिवसीय समारोप समारंभात ते बोलत होते. यावेळी खासदार प्रफुल पटेल, आमदार चित्रा वाघ, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार चैनसुख संचेती, माजी खासदार विकास महात्मे, माजी खासदार अजय संचेती, उद्योग सचिव पी. अनबलगन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे संचालक मनोज सूर्यवंशी, आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मैत्री आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

खासदार औद्योगिक महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी एआयडीचे कौतुक करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सामंजस्य करारातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीची अपेक्षा व्यक्त केली. आज विदर्भाच्या प्रत्येक क्षेत्राचा विकास होत असून त्या क्षेत्रांना व्यासपीठ देण्याचे काम या महोत्सवात झाल्याचे ते म्हणाले. याशिवाय विदर्भाचा समग्र विकास हा उद्देश असून यासाठी नागपूर आणि अमरावती हे मॅग्नेट क्षेत्र तयार करण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे ते म्हणाले. यामुळे नजीकच्या भागांचा विकास होईल. आगामी काळात पर्यटन आधारित परिषदेचे आयोजन व्हावे, असेही ते म्हणाले.

**प्रकल्पांमधून साडे सात लाख कोटींची गुंतवणूक - नितीन गडकरी**

अत्यंत यशस्वी अश्या खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या आवृत्ती मधून विविध प्रकल्पांमधून साडे सात लाख कोटींची गुंतवणूक विदर्भात होत आहे. याशिवाय गडचिरोली जिल्ह्यात जगात सर्वात उत्तम दर्जाचे लोहखनिज असून यामुळे नजीकच्या जिल्ह्यात मोठमोठे उद्योग सुरु होतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नागपूरच्या एमआरओमध्ये बोईंगचे काम सुरू असून नागपूर एव्हिएशन हब होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.



**प्लग अँड प्ले औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर राहील - पीयुष गोयल**

विदर्भात नागपूर -बुटीबोरी दरम्यान स्कील युनिव्हर्सिटी तयार करण्याचा प्रस्ताव केंद्रीय मंत्री श्री. गडकरींनी दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांनी कौतुक केले. या अर्थसंकल्पात देशात १०० प्लग अँड प्ले औद्योगिक क्षेत्र तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून यात महाराष्ट्र आघाडीवर राहील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एआयडी अध्यक्ष आशीष काळे यांनी केले. आयोजन समिती अध्यक्ष अजय संचेती, खासदार प्रफुल पटेल यांनीही यावेळी विचार व्यक्त केले. प्रारंभी खासदार औद्योगिक महोत्सवावर आधारित माहितीपट दाखविण्यात आला. तत्पूर्वी विदर्भातील सुवर्णकार यांनी फडणवीस यांचा सत्कार केला महोत्सवाला सुमारे १ लाख २५ हजार नागरिकांनी भेट दिली.

**सामंजस्य करार**

आर्टिफिशियल इलेक्ट्रॉनिक्स इंटेलिजंट मटेरियल लिमिटेड हे नागपुरात इलेक्ट्रॉनिक सेमीकंडक्टर क्षेत्रात नागपुरात १० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून ५०० रोजगार निर्मिती होणार आहे. राज्य शासनाकडून उद्योग सचिव पी. अनबलगन यांनी हा करार केला. श्रेम ग्रुप ऑफ कंपनीज बायोइंधन क्षेत्रात विदर्भात ८०० कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातुन १०० रोजगार निर्माण होणार आहे. राज्य शासनाकडून उद्योग सचिव पी. अनबलगन यांनी हा करार केला. ओलेक्ट्रा इव्हीचे चेयरमन के. व्ही. प्रदीप यांनी नागपुरातील आगामी गुंतवणुकीबद्दल माहिती दिली. हा सामंजस्य करार दावोसमध्ये झाला होता.

## संक्षिप्त...

### मनोज जरांगे तडीपार केलेल्या आरोपींचा आका, तडीपार केलेल्या आरोपींच्या पैशावरच जरांगेंचं आंदोलन चालतं- नवनाथ वाघमारे



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** ’तडीपार केलेल्या आरोपींचा आका,जरांगे’ असल्याचा आरोप ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी केलाय. ते जालन्यात बोलत होते. जरांगेंच्या मेहुण्याच्या तडीपारीवर ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी ही प्रतिक्रिया दिलीय.

तडीपारीच्या कारवाई केलेल्या आरोपींना जेलमध्ये टाकायला पाहिजे. पोलिसांनी ज्या आरोपींवर तडीपारीची कारवाई केली आहे ते पोलीस आणि महसूल विभागाला उशिरा शहाणपण सुचलेलं शहाणपण असल्याची टीकाही वाघमारे यांनी केलीय. मोठ्या आकाला जेलमध्ये टाका असं म्हणत वाघमारे यांनी जरांगेंना जेलमध्ये टाकण्याची मागणी केलीय. या माफियांच्या पैशांवर जरांगेंचं आंदोलन चालतं.जरांगेंच्या मेहुण्याला तडीपार केलं म्हणून जरांगेंनी उपविभागीय अधिकाऱ्यांना धमकवण्याची भाषा केली,त्यामुळे जरांगेंवर गुन्हा दाखल करा अशी मागणीही वाघमारे यांनी केली आहे.जरांगेला मेंटल हॉस्पिटलमध्ये दाखल करा अशीही मागणी वाघमारे यांनी केली.

### ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र ११ फेब्रुवारी रोजी मुलाखत



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात ऊर्जा विभागाच्या शंभर दिवसाच्या कामकाजाच्या अनुषंगाने तसेच सौर ऊर्जे च्या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांबद्दल महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि.११ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री ८.०० वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर ही मुलाखत पाहता येणार आहे. निवेदिका सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे.

एक्स - https://twitter.com/MahaDGIPR

फेसबुक - https://www.facebook.com/MahaDGIPR

यू ट्यूब - https://www.youtube.co/M-H-R-SHTR-DGIPR

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सर्व विभागांच्या शंभर दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेत आहेत. यामध्ये ऊर्जा विभागाचे देखील सादरीकरण करण्यात आले. राज्याला ऊर्जे च्या क्षेत्रात स्वयंपूर्ण बनविण्यासाठी घेतलेले धोरणात्मक निर्णय, सौर ऊर्जेच्या क्षेत्रात राबविण्यात येत असलेले प्रकल्प, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजना तसेच सौर ऊर्जेच्या क्षेत्रात राबविण्यात येत असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम या निर्णयांची अंमलबजावणी आणि आराखडा, याविषयी ‘महावितरण’चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्र यांनी ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात माहिती दिली आहे.

### लग्नाच्या आनंदातच सुरु झाला आक्रोश अन् किंकाळ्या, डान्स करतानाच तरुणीचा मृत्यू

विदिशा : मध्य प्रदेशच्या विदिशा जिल्ह्यामधून धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे. मृत्यू असाही येऊ शकतो? याच्यावर हा व्हिडिओ पाहून अनेकांचा विश्र्वासही बसणार नाही. लग्नामध्ये डान्स करत असताना एक तरुणी स्टेजवरच कोसळली आहे, ज्यात तिचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर लग्नाच्या आनंदी घरामध्ये आक्रोश आणि किंकाळ्यांचा आवाज येऊ लागला. या तरुणीचा मृत्यू हृदयविकाराच्या धक्क्याने झाल्याचं डॉक्टरांनी सांगितलं आहे.

विदिशा जिल्ह्याच्या मगधम रिसॉर्टमध्ये लग्न समारंभ सुरू होता. या लग्नासाठी इंदूरहून परिणीता जैन आली होती, हे लग्न परिणीताच्या बहिणीचं होतं. लग्नामध्ये डान्ससाठी स्टेजही बनवण्यात आलं होतं. लग्नानिमित्त परिणीता जैन आनंदात डान्स करत होती, पण अचानक ती स्टेजवरच कोसळली. तिकडे उपस्थित असलेल्या लोकांना काही समजण्याच्या आधीच परिणीताचा श्वास थांबला होता.

परिणीता कोसळल्यानंतर लग्नात उपस्थित असलेले लोक घाबरले. सुरूवातीला लोकांना परिणीताची ही डान्स स्टेप असल्याचं वाटलं, पण परिणीता उठत नसल्याचं पाहून तिकडे उपस्थित असलेले नातेवाईक स्टेजवर धावत गेले, तेव्हा परिणीताचा मृत्यू झाला होता. नातेवाईक परिणीताला घेऊन रुग्णालयात गेले पण परिणीताचा मृत्यू झाल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. हार्ट अटॅकमुळे परिणीताचा मृत्यू झाल्याचंही डॉक्टरांच्या तपासात समोर आलं.

## कुतूहलातून विविध विषयांवरील साहित्याची निर्मिती

- राज्यस्तरीय साहित्य संमेलनात डॉ. अच्युत गोडबोले यांचे प्रतिपादन
- मंत्री उदय सामंत यांनी दृकश्राव्य माध्यमाव्दारे संमेलनाला शुभेच्छा

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** विश्व, मनुष्य व निसर्ग निर्मितीचे लहानपणापासूनच मला प्रचंड कुतूहल होते. कुतूहलापोटी वाचनाची आवड निर्माण झाली. पुढे लेखणीतून प्रगट होत गेलो व माझ्या हातून विविध विषयांवर ५६ पुस्तकांची निर्मिती झाली असल्याचे जेष्ठ साहित्यिक डो. अच्युत गोडबोले यांनी सांगितले. सगरोळी (ता.बिलोली) येथे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर देगलूर-बिलोली विधानसभेचे आमदार जितेश अंतापुरकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा संस्कृती संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख, माजी आमदार गंगाधर पटणे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. मार्तंड कुलकर्णी साहित्यिक देविदास फुलारी आदींची उपस्थिती होती. उद्योग तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दृकश्राव्य माध्यमाव्दारे या संमेलनाला शुभेच्छा दिल्या.

रविवार (ता.९) रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई व येथील संस्कृति संवर्धन मंडळ यांच्या संयुक्त




विद्यमाने राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते.

’मुसाफिर’ या पुस्तकाने अनेकांच्या आत्महत्या रोखल्या, बोर्डरूम हे पुस्तक वाचून अनेकांनी उद्योग उभारले. समाजास याचा लाभ होत असल्याने समाधान वाटते. उद्याचे जग हे तंत्रज्ञानावर आधारित असून हे सर्वांना समजावे म्हणून मराठीतून पुस्तके लिहिली. तंत्रज्ञानाबाबत अद्ययावत राहावे. प्रचंड वाचन, गाणी, चर्चा यासह त्यातील मुख्य शिलेदार, माणसे, त्याची थेरी, मूलतत्त्वे याचा अभ्यास केला. लोकांचा विश्र्वास व माझाही आत्मविश्र्वास वाढला, माझ्यामुळे सहलेखक तयार झाले. येथील संस्थेचे काम पाहून प्रभावित झालो असल्याचे ते म्हणाले.

माझ्या मतदारसंघात हा कार्यक्रम होत असल्याने अभिमानास्पद आहे. येथे अनेक कार्यक्रमातून नागरिकांची जडणघडण होत असल्याचे आमदार जितेश अन्तापुरकर म्हणाले.

सगरोळी येथील कर्मयोग्याच्या भूमीत हे संमेलन व्हावे अशी मनापासून इच्छा होती. यापुढे सगरोळी येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरावे अशी इच्छा मार्तंड कुळकर्णी यांनी व्यक्त केली. प्रमोद देशमुख यांनी सर्व मान्यवर व सारस्वतांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. परिसरास कर्मयोगी बाबासाहेब देशमुख साहित्य नगरी तर सभा मंडपास मराठवाड्याचे भूमिपुत्र कविवर्य दे.ल. महाजन यांचे नाव दिले होते. यावेळी साहित्यिक व श्रोते मोठ्या संखेने उपस्थित होते.

संमेलनाच्या उद्घाटनासाठी मराठी भाषामंत्री उदय सामंत उपस्थित राहणार होते, परंतु त्यांनी आभासी पद्धतीने श्रोत्यांशी संवाद साधला. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राज्यशासन कटिबद्ध असून सर्वतोपरी मदत केली जाईल अशी ग्वाही देऊन संमेलनास शुभेच्छा दिल्या.

### ज्योतिर्लिंग दर्शनानंतर प्राजक्ता माळी पोहोचली प्रयागराजला, महाकुंभात केलं पवित्र स्नान

**प्रयागराज :** सध्या देशभरात महाकुंभ मेळ्याची जोरदार चर्चा सुरू आहे. उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथे सुरू झालेला हा पवित्र मेळा लाखो भाविकांसाठी श्रद्धेचं आणि भक्तीचं केंद्र बनला आहे. १३ जानेवारीपासून सुरू झालेल्या या महाकुंभ मेळ्याला आतापर्यंत कोट्यवधी लोकांनी भेट दिली असून २६ फेब्रुवारीपर्यंत हा मेळा सुरू राहणार आहे. सामान्य भक्तगणांपासून ते अनेक प्रसिद्ध व्यक्ती, सिनेमा आणि कला क्षेत्रातील कलाकार देखील या ऐतिहासिक मेळ्यात सहभागी झाले आहेत.

या लक्षणीय सोहळ्यात आता मराठी चित्रपटसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री प्राजक्ता माळी हिचंही नाव जोडलं गेलं आहे. प्राजक्ताने नुकताच महाकुंभ मेळ्यात जाऊन पवित्र स्नानाचा आणि मेळ्याच्या अद्भुत वातावरणाचा अनुभव घेतला. याचा व्हिडीओ तिने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला असून त्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या व्हिडीओत प्राजक्ता माळी महाकुंभ मेळ्यात फिरताना आणि पवित्र स्नान करताना दिसत आहे. या व्हिडीओला कॅप्शन देताना तिने लिहिलं, तीर्थराज - प्रयागराज महाकुंभ २०२५ लहानपणापासूनच कुंभ मेळ्याविषयी मनात कुतूहल होतं. १४४ वर्षांनी होणारा हा मेळा याची देही याची डोळा पहावा, अनुभवावा असं मनात आलं आणि पोचले. प्राजक्ता माळी केवळ एक अभिनेत्रीच नाही, तर एक उत्कृष्ट कवयित्री, नृत्यांगना, निवेदक आणि व्यावसायिकही आहे. तिच्या अभिनयासोबतच तिच्या बोल्ड आणि पारंपरिक स्टाईलसाठी ती नेहमी चर्चेत असते. ‘फुलवंती’ मालिकेनंतर प्राजक्ता लवकरच मोठ्या पडद्यावर नव्या चित्रपटातून झळकणार आहे. ‘चिकी चिकी बुबूम बुम’ नावाच्या या चित्रपटात ती स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहेरे, प्रसाद खांडेकर, वनिता खरात आणि प्रथमेश शिवलकर यांच्या सोबत झळकणार आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील खारघर पोलीस स्थानकासमोर धरणे आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील खारघर परिसरात नुकत्याच घडलेल्या घटनेत, किरकोळ वादातून झालेल्या मारहाणीत शिवकुमार शर्मा यांचा मृत्यू झाला आहे. रविवारी रात्री साडेआठ वाजता उत्सव चौकाजवळ, दुचाकीस्वारांमध्ये वाहन पुढे घालण्यावरून वाद झाला. या वादानंतर, एका दुचाकीस्वाराने हेल्मेटने शिवकुमार यांच्या डोक्यावर वार केले. जखमी अवस्थेत शिवकुमार खारघर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यासाठी गेले, परंतु तक्रार देत असतानाच ते बेशुद्ध पडले. पोलीसांनी






त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेनंतर, हिंदू संघटनांनी खारघर पोलीस ठाण्याबाहेर निदर्शने केली. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील आज या आंदोलनात, मारेकऱ्यांना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, इजतीमा सारख्या कार्यक्रमांना महाराष्ट्रात बंदी घालण्याची, अशा कार्यक्रमांतील प्रक्षोभक भाषणांची चौकशी करण्याची, आणि पोलीस प्रशासनातील बेजबाबदार अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याची मागणीही करण्यात आली.

खारघर पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. या प्रकरणी अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

## विविध वृत्त...

### वाहनावरचा ताबा सुटल्याने कारचा भीषण अपघात; चालक ठार तर एक गंभीर जखमी



दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** ढाणकी जवळील महागाव फाट्या जवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या गाडीच्या अपघातात होऊन शिवराज देशमुख चालकाचा मृत्यू झाला आहे तर माधव गंगाराम काळे जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली . स्विफ्ट डिजायर या गाडी (क्रमांक ए.एम. ०२/सी. आर. ४२११ ) चालक शिवराज देशमुख व माधव गंगाराम काळे रा. धानोरा हे दोघेही धानोरा येथून ढाणकीला येत असतानी अपघात झाला. भरधाव वेगामुळे चालकाचा वाहनावरील ताबा हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

### हत्या करून महिलेच्या मृतदेहावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना; हुडकेश्वर पोलीस स्टेशन परिसरात समोर



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपुरातील हुडकेश्वर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणाऱ्या आनंद नगर मध्ये एकच खळबळ उडाली जेव्हा महिलेच्या हत्येची घटना उघडकीस आली, पोलिसांनी महिलेच्या मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठवला आणि हत्येचा गुन्हा नोंदविला, पोस्टमार्टेम मध्ये धक्कादायक माहिती मिळाली की महिले सोबत बलात्कार पण करण्यात आला आहे.



पोलिसांनी आरोपीचा शोध घेत असताना माहिती मिळाली की रोहित टेकाम हा हत्येच्या दिवशी महिलेला भेटण्यासाठी घरी आला होता,महिला आणि रोहित हे दोघे १ वर्षा पासून एकमेकांना ओळखत होते, पोलिसांनी रोहित टेकाम ला ताब्यात घेऊन विचार पूस केली असता विकृत आरोपी रोहित टेकाम याने सांगितले की मी महिलेकडे शरीर सुखांची मागणी केली होती परंतु महिलेने नकार दिल्याने आरोपी रोहित ने जबरदस्ती करतानी महिला आरडाओरडा करत होती म्हणून आरोपीने गळा आवळून महिलेची हत्या केल्या नंतर मृतदेह वर बलात्कार केला. हुडकेश्वर पोलिसांनी रोहित टेकाम विरुद्ध हत्येच्या आणि बलात्कार गुन्हा दाखल करून तपासा सुरू केला आहे.

### भाड्याने घेतलेली कार विक्री करून फसवणूक करणारी टोळी तालुका पोलिसांच्या जाळ्यात

**धुळे/प्रतिनिधी :** मोठ्या शहरांमध्ये चालकाविना आलीशान कार भाडयाने पुरविणार्या कंपन्या कार्यरत आहेत. अशा कंपन्यांकडुन भाडयाने वाहने घेवून त्यांची परस्पर विक्री करुन फसवणुक करणाऱ्या हैदराबादच्या टोळीला धुळे तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे. या टोळीत सहा जणांचा समावेश असून त्यांच्याकडून दोन कार जप्त करण्यात आल्या. त्यांच्या विरोधात धुळे तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याकडून आणखी इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

जेव्हा फिर्यादी अभिषेक पाटील हे नाव बदलून एक्सएल-६ टीजी-०७ ही कार खरेदी करण्यासाठी शिरूड चौफुली पोहचले. त्याठिकाणी कारसोबत आलेल्या सहा जणांपैकी तीन जण हे मागील वेळेसही आले होते, हे त्यांनी ओळखले. हे सहा जण अभिषेक पाटील यांना पाहून पळून जात होते. तेव्हा नागरिकांच्या मदतीने पकडून अभिषेक पाटील यांनी त्यांना धुळे तालुका पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. तालुका पोलिसांनी या सहा जणांकडून ६ लाख रुपयांच्या दोन अलिशान गाड्या देखील जप्त केल्या आहेत. या कार कोणाच्या आहेत. त्यासुद्धा या लोकांनी चोरुन आणल्या आहे का, याचा शोध आता पोलीस घेत आहे.




# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अतिरिक्त निधी द्या

## आमदार सिद्धार्थ खरात यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साकडे



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्हा हा ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा जिल्हा आहे. या जिल्ह्याला जागतिक दर्जाच्या लोणार सरोवराची देणगी लाभलेली आहे. यासह संपूर्ण जगाला आदर्शवत राजा देणारे देणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ यांचे जन्मस्थळ आहे. विशेष करून जिल्ह्यातील ऐतिहासिक दर्जा हा मेहकर लोणार मतदार संघात असून या मतदारसघासह संपूर्ण जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी वार्षिक आराखड्यासह आपण अतिरिक्त १०० कोटी रुपयांचा निधी निधी द्यावा, असे साकडे मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांना घातले. बुलढाणा जिल्हा नियोजन समितीने सन २०२४-२०२५ आर्थिक वर्षासाठी ४४० कोटी रुपयाचा वार्षिक योजना मंजूर करून नियत मंजूर केला आहे. तर २०२५ -२०२६ आर्थिक वर्षासाठी ५३६ कोटी रुपयांचा वार्षिक आराखडा जिल्ह्यासाठी मंजूर करण्यासाठी शासनाकडे सादर केला आहे. या वार्षिक आराखड्यावर अंतिम निर्णय घेण्यासाठी वित्तमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, पालकमंत्री मकरंद पाटील, मंत्री आकाश फुंडकर,जिल्हाधिकारी किरण पाटील, आमदार सिद्धार्थ खरात यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीमध्ये आमदार सिद्धार्थ खरात यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी वार्षिक योजना सह अतिरिक्त १०० कोटीचा निधी मंजूर करावा, असे साकडे वित्तमंत्री अजित पवार यांना घातले.तसेच त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांचे जन्मस्थळ जागतिक दर्जा चे सरोवर असलेल्या लोणार पर्यटकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध कराव्या, मेहकर लोणार चे बसस्थानक, महिला व मुलींसाठी स्वच्छता गृह, पाणी व्यवस्था याकडे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे लक्ष वेधले. गतवर्षीच्या तुलनेत केवळ वाढीव ९५ कोटी ऐवजी अतिरिक्त १०० कोटी म्हणजे रुपये ५३५ कोटी ऐवजी ६३५ कोटींचा नितव्यय असलेली वार्षिक जिल्हा योजना २०२५-२०२६ साठी मंजूर करण्याची मागणी केली असता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावर अंतिम निर्णय घेऊ असे आश्वासन आमदार सिद्धार्थ खरात यांना दिले. मतदार संघातील विकास कामाबरोबर संपूर्ण जिल्ह्याचा विकास व्हावा, यासाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी मतदार संघाचाच नव्जिहे तर, संपूर्ण जिल्ह्याचा विकास होण्यासाठी निधीत वाढ करण्याची मागणी केल्याबद्दल त्यांचे मतदारसंघातच नव्हे तर संपूर्ण जिल्हाभर कौतुक होत आहे.

## अपघातग्रस्त माकडाचे युवकांनी वाचवले प्राण

### माकडावर पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये उपचार करून वनविभागाच्या केले स्वाधीन





दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** येथील आरेगाव रोडवर कॉटन मार्केट जवळ झालेल्या अपघातात गंभीर जखमी माकडाचे प्राण वाचवित भूतदया प्रति सहानुभूती ठेवत त्या माकडावर उपचार करून त्याला सुखरूप वनविभागाच्या स्वाधीन केले. ही घटना ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घडली.

प्राप्त माहितीनुसार डोणगाव येथील आरेगाव रोडवर कट्टर मार्केट जवळ झालेल्या अपघातात एक माकड गंभीर जखमी झाले होते. सदर घटना येथील युवकांच्या लक्षात येतात येथील नागेश परमाळे या युवकासह मुन्ना आंबेकर, विशाल पांडव, ओम जाधव, कृष्ण बकाल, गोपाल बोरुडे, सुनील पाटील आखाडे, संदिप पळसकर, दीपक इंगळे, नागेश परमाळे, संदीप गाभणे, रामदास मेरकर या युवकांनी घटनास्थळी धाव घेतली जखमी माकडाला पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये आणून त्यावर प्राथमिक उपचार केले.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपचारानंतर व सल्ल्यानुसार सदर माकडाला वन विभागाकडे सुपूर्द करण्यात आले. सदर युवकाच्या पुढाकारामुळे माकडाचे प्राण वाचल्याने या कार्याबद्दल या युवकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## तृतीय पंथीयांची वाशीम निघाली भव्य कलश यात्रा

### राष्ट्रीय किन्नर महासंमेलन : किन्नरांचे संत महात्मा उपस्थित



दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच अखिल भारतीय मंगलामुखी किन्नर महासंमेलनाचे आयोजन ६ ते १६ फेब्रुवारी पर्यंत वाशीम येथील पवन मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे. यानिमित्त ९ फेब्रुवारी रोजी वाशीम शहरात किन्नर राज्यावतीने भव्य कलश यात्रा काढण्यात आली. या कलशात्रेत शेकडो किन्नर सहभागी झाले होते. संपूर्ण विश्वात सुख - शांती , समृद्धी नांदावी आणि किन्नरांच्या समस्यांचे निराकरण व्हावे. यासाठी हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती वाशीम येथील आयोजन समितीच्या किरण अम्मा व शहनाज नायक यांनी दिली.

स्थानिक रिसोड रोडवरील पवन मंगल कार्यालयात आयोजित अखिल भारतीय मंगलामुखी किन्नर महासंमेलना करिता संपूर्ण भारतातून किन्नर लोकांचा जमावडा व आगमन वाशीम येथे झाले आहे. सदर संमेलनामध्ये संपूर्ण देशभरातील किन्नर यांचे संत महात्मा यांचेही आगमन होत आहे. वाशीम शहरातून ९ फेब्रुवारी रोजी कलश यात्रा सुद्धा काढण्यात आली. सदर महासंमेलनाच्या माध्यमातून देशभरातून एकत्रित आलेले किन्नर हे विविध विषयावर मंथन करणार असून त्यांच्या समस्या शासन दरबारी व समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी पुढाकार घेणार आहेत. वाशीम जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील हे संमेलन होत असल्याची माहितीही किरण अम्मा यांनी दिली. किन्नरांच्या राष्ट्रीय संमेलना निमित्त वाशीम शहरात काढण्यात आलेल्या भव्य कलश यात्रेत शेकडो किन्नर सहभागी झाले होते.

## महारचिकना येथे चोरट्यांनी हाणला ५८ हजार रुपये किमतीच्या जनावरांवर डल्ला

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महार चिकना :** महार चिकना येथे मागील वर्षी एक दोन ठिकाणी चोरीचे प्रकरण झाले होते परंतु त्यातील कुठल्याही प्रकरणाचा पोलिसांना सुगावा लागला नसल्याची चर्चा परिसरातील नागरिक करत आहेत

लोणार. तालुक्यातील महारचिकना येथील सिद्धेश्र्वर दत्तात्रय घुगे यांचा तीस रुपये किमतीचा बैल व संतोष ज्ञानबा सोनुने यांची पंधरा हजार रुपये किमतीची गाय, दहा हजार रुपये किमतीचा गोरा व तीन हजार रुपये किमतीचे वासरू असे दोघांचे मिळून ५८ हजार रुपयांचे जनावरे ७ फेब्रुवारी रोजी रात्री चोरट्याने लंपास केले. परिसरात गुरे चोरीच्या घटनेत वाढ झाली असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. प्राप्त माहितीनुसार तालुक्यातील महार चिकना येथील सिध्देश्र्वर घुगे यांनी आपल्या घराजवळ असलेल्या खाली जागेत दोन्ही बैलाची चारा वरण केली व घरी गेले. परंतु रात्री दरम्यान चोरट्यांनी दोन्ही बैल सोडून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले.त्यातील एक बैल परत आला तसेच महार चिकना फाटा येथे महादेवाच्या मंदिराजवळ संतोष ज्ञानबा सोनुने यांची एक गाय एक गोरा आणि एक वासरू हे बांधले होते ते सुद्धा चोरट्याने ७ फेब्रुवारी रोजी रात्री लंपास केले. सदर प्रकरणाची सिद्धेश्र्वर घुगे यांनी बीबी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली असून पुढील तपास ठाणेदार संदीप पाटील पोलीस हेडकॉन्स्टेबल अर्जुन सांगळे व त्यांचे सहकारी करीत आहेत.

# साहित्यिक संगीता चव्हाण संजीवनी सेवाव्रती पुरस्काराने सन्मानित

## वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार सोहळा

दैनिक आपला विदर्भ

**खामगाव/प्रतिनिधी :** सामाजिक, धार्मिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या डोणगांव ता मेहकर येथील संजीवनी सेवाभावी परिवाराच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रगती,समृध्दी कडे जाताना संवेदनशीलता कमी होत आहे,ती संवेदनशीलता टिकविण्याचे काम संजीवनी परिवाराच्या माध्यमातून होत आहे याचा मला अभिमान आहे,असे मत आ श्वेताताई महाले यांनी व्यक्त केले असुन यावेळी साहित्यिक व कवी संगीता चव्हाण यांना संजीवनी सेवाव्रती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.






सौ संगीता जितेंद्र सिंह चव्हाण या जलंब येथील पाई विद्यालय मध्ये सहाय्यक शिक्षिका असुन त्या उत्कृष्ट कविता,लिखाण करतात, महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक साहित्य संमेलन मध्ये त्यांचा अग्रेसर सहभाग असतो, यापूर्वी साहित्यिक क्षेत्रात त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत, त्यांच्या साहित्याची दखल घेऊन संजीवनी परिवाराने त्यांना सन्मानित केले आहे.

दि २ फेब्रुवारी राजुरकर मंगल कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयंतबाप्पु बिडवई तर प्रमुख अतिथी म्हणून सत्कारमूर्ती आ.श्र्वेताताई महाले, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद देशमुख, श्री शिवाजी शिक्षण संस्था अध्यक्ष राजेंद्र आखाडे, परतवाडा पोलीस निरीक्षक सुरेश म्हस्के,भाजपा तालुकाध्यक्ष अँड शिव ठाकरे, सौ वंदना आखाडे, डॉ अनुपमा झोरे,राजेंद्र पळसकर, यांची उपस्थिती होती, मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन आयोजकांच्या वतीने अतिथीचां भव्यदिव्य स्वागत समारंभ संपन्न झाला, प्रास्ताविक मनोगतातून संजीवनी परिवाराचे अध्यक्ष डॉ गजानन उल्हामाले यांनी पुरस्कार देऊन सन्मानित करण्या मागील भूमिका स्पष्ट केली,

याप्रसंगी स्व माधवराव उल्हामाले स्मृति प्रित्यर्थ संजीवनी सेवाव्रती पुरस्काराने सौ संगीता जितेंद्र सिंह चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले, यावेळी त्यांनी कविता वाचन करून दाद मिळवली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हमीद मुल्लाजी तर आभार सुरेश आप्पा फिसके यांनी मानले. यशस्वीतेसाठी गणेश वाघमारे, सुरेन्द्र सिंह चव्हाण,प्रा गजानन सातपुते, डॉ नकुल फुले यांनी अथक परिश्रम घेतले.